नि. फौजदारी खटला क्र. **<u>१७९/२०२२</u>**
सरकार विरूद्ध गणेश
**निशाणी १७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : पुरूषोत्तम रामकृष्ण लाड, |
| वय | : ४२ वर्षे |
| धंदा | : नौकरी, |
| राहणार | : रोहणा, ता. अकोट, जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

दहिहांडा पोलीसांनी मला कोणताही पंचनामा करण्यासाठी बोलवले नाही. मी शेतातुन येत असतांना ब्रम्हपुरी शिवारात समोरून पोलीसांची गाडी आली व पोलीसांनी मला सही करण्यास सांगितले म्हणुन मी एका कागदावर सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०३/२०२२ रोजी ग्राम. ब्रम्हपुरी येथे पुर्णा नदीच्या पात्रात दहिहांडा पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व मला वाचुन दाखवला व त्यानंतर मी त्यावर त्याच ठिकाणी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पुर्णा नदीचे ब्रम्हपुरी येथली पात्र मी पाहिलेले असुन, तिचा प्रवाह त्याठिकाणी पुर्व—पश्चिम आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी रेती घाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद पंचनाम्यावरील सही पुर्णा नदी पात्रातील रेती घाटावर केली होती. मी दहावा वर्ग शिकलो असुन मला लिहिता — वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी कुठलाही दस्त वाचुन समजुन घेतल्याशिवाय त्यावर सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी वाचला व समजुन घेतला होता व त्यावर घटनास्थळी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २६.०९.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.